**आरोपी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – सतिशकुमार आण्णाप्पा शिंदे,

**वय** – ४१ वर्ष, **व्यवसाय** - आजरा बँक शाखा निपाणी शाखाधिकारी,

**राहणार**– इंगळी, ता. चिक्कोडी, जि. बेळगांव.

**सरतपास – श्री. आर. एस. चव्हाण, वकील.**

**१.** मी दि. १७.०७.२०१७ पासून आजरा बँकेच्या निपाणी शाखेत कार्यरत आहे. मी दि. ०९.०३.२०१८ पासून निपाणी शाखेत शाखाधिकारी पदावर कार्यरत आहे. आरोपीने कर्ज मंजूरीसाठी आमच्या निपाणी शाखेत अर्ज दिला होता. त्याने दहा वर्षाच्या कालावधी साठी १२,००,०००/– रुपये कर्जाची मागणी केली होती. आरोपीला दि. ०६.०८. २०१८ रोजी कर्जाची रक्कम देण्यात आली होती. त्याच्या कर्जाची मुदत २०२८ साली संपत होती.

**२.** आरोपी आमच्या निपाणी शाखेत कर्जाचे हप्ते भरत होता. आरोपी त्याचा अपघात होण्यापूर्वी पर्यंत कर्जाचे हप्ते भरत होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने २०२२ सालापर्यंत कर्जाचे हप्ते भरले आहेत. आरोपी स्वतः हप्त्याची रक्कम भरण्यासाठी बँकेत येत होता तसेच त्याच्या खात्यातून वर्ग करत होता. आरोपीने त्याचा अपघात झाल्याबाबत आमच्या कार्यालयाला पत्र दिले होते. आरोपीकडे थकीत रक्कमेची स्वतः भेट घेवून तसेच नोटीस पाठवून मागणी केली होती. आरोपीची प्रत्यक्ष भेट घेतल्यानंतर त्याला नोटीस पाठवली होती.

**३**. आरोपीकडे वसुली साठी मी, मुख्य शाखेचे वसुली अधिकारी आणि शिपाई जात होतो. मला वसुलीसाठी घरी जाण्यापूर्वी कर्जदाराला नोटीस दयावी लागते याची माहिति नाही. मी साधारणतः २५ ते ३० वेळा वसूलीसाठी आरोपीच्या घरी गेलो होतो. मी सन २०२३–२४ मध्ये शेवटी आरोपीकडे वसुलीसाठी गेलो होतो.

**४**. निपाणी शाखेतील व्यवहाराबाबत आजरा मुख्य शाखेला माहिती दिली जाते. आरोपीने दि.३०.४.२०२१ पर्यंत कर्ज खात्यात ५,१९,०११/– रुपये भरले होते. आमच्या आजरा शाखेने दि.१०.०३.२०२२ रोजी आरोपीला ३,२०,०००/– देणे लागत

असल्याचे पत्र दिले होते. आरोपीने निपाणी शाखेकडे कागदपत्रांची पुर्तता केली होती. हे म्हणणे खरे नाही की, कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी कर्जासंबंधी तारण कागदांसह कोरे धनादेश घेतले जातात. मला दि.०४.०५.२०२२ रोजी आरोपी आजारी असून झोपून होता. आमच्या शाखेपासून आरोपीचे घर २ किमी अंतरावरती आहे. कर्ज मंजूर झाल्यानंतर कागदपत्रे निपाणी शाखेत ठेवली जातात. दि.०४.०५.२०२२ रोजी आरोपीने वादातील धनादेश वसुली अधिका–यांकडे दिला आहे. मला त्या दिवशी कोणता वार होता याबाबत सांगता येणार नाही.

**सरतपास पुर्ण.**

**तक्रारदारा तर्फे उलटतपास – श्री. डी. डी. आजगेकर, वकील.**

**५**. कर्जदाराने कर्जाचे सलग ३ हप्ते थकवल्यानंतर त्याचे कर्ज प्रकरण अकार्यक्षम कर्जाच्या यादीत जाते. आरोपीचे प्रकरण अकार्यक्षम कर्जाच्या यादीमध्ये होते. त्यामुळे वसुलीच्या पुढील कार्यवाही साठी ते बँकेच्या मुख्य शाखेकडे पाठवले होते. दि.१०.०३.२०२२ रोजी आरोपीला त्याच्या थकीत कर्जाच्या रक्कमेबाबत पत्र देण्यात आले होते.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

**फेरतपास नाही.**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २६.०२.२०२६. (आर. पी. थोरे)
आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.